## दृष्टिक्षेपात

### युक्रेनमधील गाव रशियाच्या ताब्यात

**किव्ह :** महिनाभराच्या लढाईनंतर रशियाच्या सैनिकांनी युक्रेनमधील कुराखोव्ह या भागावर ताबा मिळविला आहे. हा भाग दोनेत्स्क प्रदेशाचा हिस्सा आहे. या प्रदेशातच सध्या दोन्ही देशांमध्ये जमिनीवरील लढाई सुरू आहे. कुराखोव्ह हे युक्रेनचे अत्यंत मोक्याचे गाव आहे. त्याचे नियंत्रण रशियाकडे गेल्याने युक्रेनला धक्का बसल्याचे मानले जात आहे. युक्रेनने मात्र या घडामोडीवर प्रतिक्रिया दिलेली नाही. अमेरिकेमध्ये दोन आठवड्यामध्ये सत्तांतर होणार असून डोनाल्ड ट्रम्प हे अध्यक्ष होणार आहेत. अध्यक्ष होताच युद्ध थांबविण्याची ग्वाही त्यांनी दिली आहे. मात्र, युद्धभूमीवरील रशियाची स्थिती मजबूत होत असल्याने ट्रम्प यांनाही बरेच प्रयत्न करावे लागतील, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

### खैबर पख्तुन्ख्वामध्ये संचारबंदी लागू

**पेशावर :** सरकारी ताफ्यावर झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानमधील खैबर पख्तुन्ख्वा प्रांतातील कुर्रम जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली आहे. या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार सुरू असल्याने दोन महिन्यांसाठी लोकांना एकत्र येण्यास, सभा घेण्यास आणि इतर सार्वजनिक कार्यक्रम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात आणि परिसरात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी हा निर्णय घेतला असल्याचे येथील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### उत्तर कोरियाकडून क्षेपणास्त्र चाचणी

**सोल :** उत्तर कोरियाने आज बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी घेतल्याचा दावा दक्षिण कोरियाने केला आहे. हे क्षेपणास्त्र समुद्रात ११०० किलोमीटर लांबपर्यंत गेल्याचा दावाही करण्यात आला आहे. उत्तर कोरियाने आपली हल्ला करण्याची क्षमता वाढविली असल्याने चिंतेचे वातावरण असल्याचे दक्षिण कोरियाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### 'बुद्धा एअर'च्या विमानात बिघाड

**काठमांडू :** 'बुद्धा एअर' या विमान कंपनीच्या विमानात आज उड्डाणानंतर बिघाड झाल्याचे लक्षात आल्यानंतर ते काठमांडूमधील त्रिभुवन विमानतळात तातडीने उतरविण्यात आले. या विमानात ७६ प्रवासी होते. विमानाने याच विमानतळावरून उड्डाण केले होते. मात्र काही मिनिटांतच विमानाच्या डाव्या इंजिनमध्ये आग लागल्याचे लक्षात आल्यानंतर वैमानिकाने ते माघारी फिरवत धावपट्टीवर सुरक्षित उतरविले.

### इस्त्रायलींच्या बसवर दहशतवाद्यांचा हल्ला

**तेल अविव :** पश्चिम किनारपट्टी भागात इस्त्रायली नागरिकांना घेऊन जाणाऱ्या प्रवासी बसवर काही हल्लेखोरांनी गोळीबार केला. या हल्ल्यात तिघांचा मृत्यू झाला, तर सात जण जखमी झाले. इस्त्राईलच्या सैनिकांकडून पश्चिम किनारपट्टी भागात वारंवार छापे टाकले जात असल्याने पॅलेस्टाइनमधील अनेक संघटनांनी निषेध व्यक्त केला आहे.




# धरणामुळे नुकसान नाही

## चीनची भारताला ग्वाही; ब्रह्मपुत्रेवरील प्रकल्पाबाबत ठाम

**बीजिंग, ता. ६ (पीटीआय) : भारताच्या सीमेला लागून असलेल्या तिबेटमध्ये ब्रह्मपुत्रा नदीवर जगातील सर्वांत मोठे धरण बांधण्याच्या निर्णयावर ठाम असल्याचे चीन सरकारने आज स्पष्ट केले, तसेच पूर्ण अभ्यास करून आणि शास्त्रज्ञ व अभ्यासकांबरोबर चर्चा केल्यानंतरच या प्रकल्पाचे नियोजन केले असल्याने भारत आणि बांगलादेश या देशांवर त्याचा कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, अशी ग्वाहीही चीनने दिली आहे. चीननंतर भारत आणि बांगलादेश या देशांमधून ब्रह्मपुत्रा नदी वाहते.**

तिबेटमध्ये हिमालय पर्वतरांगेमध्ये चीन यारलुंग त्सांग्पो (ब्रह्मपुत्रेचे तिबेटी नाव) नदीवर जलविद्युत प्रकल्प उभारणार आहे. यासाठी या नदीवर जगातील सर्वांत मोठे धरण बांधले जाणार आहे. धरणाचे नियोजित स्थान भूकंपप्रवण क्षेत्रात आहे. या प्रकल्पासाठी एकूण १३७ अब्ज डॉलर खर्च होणार आहे. या प्रकल्पाचा भारत आणि बांगलादेशला फटका बसू शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. त्याबाबत चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्याने आज पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण दिले. "या प्रकल्पाचे नियोजन करताना वैज्ञानिक पद्धतीने परीक्षण करण्यात आले आहे. पर्यावरण, भौगोलिक स्थिती, जलस्रोत यावर कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही. उलट, नदीच्या पुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी या प्रकल्पाची मदत होईल आणि नैसर्गिक आपत्ती टाळता येईल," असा दावा चीनने केला आहे.



### भारताची अमेरिकेबरोबर चर्चा

- चीनने मागील महिन्यात हिमालयाच्या पर्वतरांगेतील एका मोठ्या दरीमध्ये धरण बांधण्याच्या नियोजनावर शिक्कामोर्तब केले आहे. या धरणामुळे ब्रह्मपुत्रेचा तिबेटमधील प्रवाह बदलणार आहे. ती एक मोठा वळसा घेऊन नंतर अरुणाचल प्रदेश आणि बांगलादेशातून वाहणार आहे. हे धरण बांधताना भारत आणि बांगलादेशला फटका बसणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन भारताने केले आहे. तसेच, या प्रकल्पाबाबतच्या घडामोडींवर आमची नजर असून पाण्याबाबतच्या आमच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब करू, असेही भारताने म्हटले आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिव्हन सध्या भारत दौऱ्यावर असून त्यांच्या आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्यात झालेल्या चर्चेतही चीनच्या धरणाचा मुद्दा उपस्थित झाला होता.

## पहिली बुलेट ट्रेन लवकरच धावणार : मोदी

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. ६ : देशातील पहिली बुलेट ट्रेन धावण्याची वेळ आता खूप लांब नाही, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी रेल्वेच्या विविध योजना व प्रकल्पांच्या उद्घाटनप्रसंगी केली. रेल्वेच्या जम्मू विभागाची सुरुवात तसेच तेलंगणमधील चरलापल्ली स्थानकाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले.

'वंदे भारत' रेल्वेला स्लीपर कोच जोडले जात असून ताशी १८० किलोमीटर इतक्या वेगाने या गाड्या धावत असल्याचे सांगून मोदी म्हणाले की, वाहतुकीच्या पायाभूत क्षेत्रात मागील काही काळात आमूलाग्र बदल झाला आहे. विशेषतः मेट्रोचे आणि रेल्वेचे जाळे वेगाने विस्तारत आहे.

रेल्वेच्या जम्मू विभागाअंतर्गत ७४२.१ किलोमीटर लांबीचे जाळे कार्यरत राहणार आहे. यात पठाणकोट, उधमपूर, श्रीनगर, बारामुल्ला, भोगपूर, सिरवाल-पठाणकोट, बटाला-पठाणकोट आणि जोगिंदरनगर या भागांचा समावेश आहे.

# 'इंग्लिश विंग्लिश'मध्ये भारत सर्वोत्तम

**पीअरसन अहवाल**

**नवी दिल्ली, ता. ६ :** 'पीअरसन'च्या जागतिक इंग्रजी प्राविण्य अहवालानुसार, भारतीय बाजारपेठेने अलीकडच्या वर्षांत इंग्रजी भाषेच्या कौशल्यांमध्ये लक्षणीय वाढ अनुभवली आहे. इंग्रजी बोलण्यात भारत जगात आघाडीवर असून, त्याचे गुणांकन जागतिक सरासरीपेक्षा अधिक आहे, तर लेखनात सरासरी गुणांकन ६१ असून, ते जागतिक गुणांकनाच्या समतुल्य आहे. एकूण इंग्रजी कौशल्यांमध्ये मात्र, भारताचे सरासरी गुणांकन (५२) जागतिक सरासरीपेक्षा (५७) कमी आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय बाजारपेठेत इंग्रजीतील कौशल्य वाढत आहे. वाढते डिजिटल कम्युनिकेशन आणि जागतिक व्यवसाय क्षेत्रात लिखित इंग्रजीची वाढती आवश्यकता यामुळे इंग्रजी लेखनातील कौशल्यात सुधारणा होत आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

भारत, फिलीपिन्स, जपान, इजिप्त, कोलंबिया आणि युरोपमधील इंग्रजी प्राविण्यातील कलांचे विश्लेषण या अहवालात करण्यात आले आहे. पीअरसनच्या जागतिक इंग्रजी प्राविण्य अहवालानुसार, जगभरात आयोजित केलेल्या अंदाजे सात लाख ५० हजार विविध चाचण्यांमधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून, सध्याची कौशल्य पातळी आणि उदयोन्मुख कल यांची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे.

| गुणांकन | भारत | जग |
|---|---|---|
| इंग्रजी बोलणे | ५७ | ५४ |
| लेखन | ६१ | ६१ |
| एकूण प्राविण्य | ५२ | ५७ |

**इंग्रजी बोलण्यातील कौशल्यात अव्वल शहरे**

| | |
|---|---|
| दिल्ली | ६३ |
| राजस्थान | ६० |
| पंजाब | ५८ |

**इंग्रजी संभाषणाचा सर्वाधिक वापर होणारे क्षेत्र** — वित्त, बँकिंग सरासरी गुणांक: भारत - ६३, जागतिक- ५६

**सर्वांत कमी वापर होणारे क्षेत्र** — आरोग्यसेवा भारत - ४५

**इंग्रजी कौशल्यांच्या अचूक चाचणीचे फायदे**
- उत्तम कर्मचाऱ्यांची निवड शक्य
- अयोग्य उमेदवाराच्या निवडीमुळे होणारे नुकसान टळते
- विश्वासार्हतेचे संरक्षण
- वेगवान वाढ शक्य

"आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत, इंग्रजीतील प्रावीण्य हे केवळ एक कौशल्य नसून एक धोरणात्मक संपत्ती आहे. आमचा हा अहवाल, कंपन्यांमधील प्रमुखांना कर्मचाऱ्यांची नियुक्ती आणि मनुष्यबळाचा विकास याबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी मदत करतो. माहितीसाठ्याच्या सखोल विश्लेषणातून आलेले हे निष्कर्ष कंपन्यांना उत्तम मनुष्यबळ तयार करण्यास उपयुक्त ठरतात, त्यामुळे त्या स्पर्धेत टिकून राहू शकतात आणि विकास घडवू शकतात.

**- जिओव्हानी जिओव्हानेली,** अध्यक्ष, इंग्रजी भाषा शिक्षण विभाग, पीअरसन



**लॉस एंजेलिस :** मनोरंजन क्षेत्रातील प्रतिष्ठित ८२व्या गोल्डन ग्लोब पुरस्कारांचे वितरण सोमवारी बिव्हर्ली हिल्स येथे झाले. यात सर्वांत यशस्वी ठरलेल्या 'एमिलिया पेरेझ'मधील कलाकार.

# 'गोल्डन ग्लोब'मध्ये 'एमिलिया पेरेझ'ची बाजी

## भारताच्या पदरी निराशा; जपानचा 'शोगुन' सर्वोत्कृष्ट

लॉस एंजेलिस, ता. ६ (पीटीआय) : मनोरंजन विश्वातील प्रतिष्ठेच्या पुरस्कारांपैकी एक असलेल्या गोल्डन ग्लोब पुरस्कार सोमवारी सकाळी (भारतीय वेळेनुसार) लॉस एंजेलिसमधील बिव्हर्ली हिल्टन येथे रंगला. चित्रपट आणि दूरचित्रवाणीवरील मालिकांचा सन्मान केल्या जाणाऱ्या या ८२ व्या पुरस्कारांमध्ये फ्रेंच दिग्दर्शक जॅक ऑडियार्ड यांच्या 'एमिलिया पेरेझ' या चित्रपटाचा दबदबा राहिला. दूरचित्रवाणीवरील मालिकेत अमेरिका-जपानचा संयुक्त निर्मिती असलेला 'शोगुन' सर्वोत्कृष्ट ठरला.

बिगर इंग्रजी चित्रपटाच्या गटात 'एमिलिया पेरेझ'ला पुरस्कार मिळाला. याशिवाय अनेक विभागांमध्येही एमिलिया पेरेझ'ने बाजी मारली. भारताकडून बिगर इंग्रजी चित्रपटाच्या गटात दिग्दर्शिका पायल कापडिया हिचा 'ऑल वुई इमॅजिन अॅज लाइट' या चित्रपटाचा तर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शिका म्हणून कापडिया हिला नामांकन मिळाले होते. यामुळे यंदाच्या 'गोल्डन ग्लोब'वर भारतीयांचा ठसा उमटेल, अशी आशा भारतीयांना होती. पण अखेर पदरी निराशाच आली. या दोन्ही गटांतून भारत बाहेर पडला. युद्धोत्तर स्थलांतरितांचे अनुभव सांगणाऱ्या 'द ब्रुटालिस्ट' हा ऐतिहासिक चित्रपट उत्कृष्ट ठरला.

### निवडक पुरस्कारविजेत्यांची यादी

- उत्कृष्ट चित्रपट (बिगर इंग्रजी) : एमिलिया पेरेझ
- उत्कृष्ट चित्रपट ( संगीतमय किंवा विनोदी) : एमिलिया पेरेझ
- उत्कृष्ट चित्रपट (ॲनिमेटेड) : फ्लो
- उत्कृष्ट चित्रपट (नाट्यमयता) : द ब्रुटालिस्ट
- सिनेमॅटिक आणि सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट : विकेड
- उत्कृष्ट अभिनेत्री (नाट्य) : फर्नांडा टॉरेस (ॲम एम स्टिल हियर)
- उत्कृष्ट अभिनेत्री (दूरचित्रवाणी मालिक, नाटक) हिरोयुका सनदा (शोगुन)
- उत्कृष्ट अभिनेत्री (दूरचित्रवाणी मालिका- संगीत व विनोद) : जीन स्मार्ट (हॅक्स)
- उत्कृष्ट साहाय्यक अभिनेत्री : झो साल्दाना (एमिलिया पेरेझ)
- उत्कृष्ट अभिनेता (नाट्य) : एड्रियन ब्रोडी (द ब्रुटालिस्ट))
- उत्कृष्ट साहाय्यक अभिनेता : कायरन कुकलिन (ए रिअल पेन)

## भारतात एचएमपीव्ही विषाणूची 'एंट्री'

>> पान १ वरून

महिन्यांच्या दुसऱ्या अर्भकाची चाचणी पॉझिटिव्ह आल्याने या अर्भकालाही एचएमपीव्हीचा संसर्ग झाल्याचे निष्पन्न झाले. तमिळनाडूतही दोन अर्भकांना या विषाणूचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. गुजरातेत खासगी रुग्णालयात दाखल झालेल्या दोन महिन्यांच्या अर्भकालाही एचएमपीव्हीची लागण झाली आहे.श्वसनाच्या संसर्गामुळे राजस्थानातील दुंगारपूरमध्ये राहणाऱ्या या अर्भकाला २४ डिसेंबरला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याची एचएमपीव्हीची चाचणी पॉझिटिव्ह आली, अशी माहिती अहमदाबाद महापालिकेचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी भाविन सोळंकी यांनी दिली. त्याच्यावर उपचार करणाऱ्या खासगी रुग्णालयाने याबाबतची माहिती उशिरा दिली. या अर्भकाला विलगीकरणात ठेवले आहे, असेही त्यांनी सांगितले.

**असामान्य वाढ नाही!**

भारतीय भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचा डेटा आणि एकीकृत रोग देखरेख कार्यक्रमाच्या डेटाच्या आधारे देशात इन्फ्लुएंझासारख्या किंवा श्वसनाच्या गंभीर आजाराच्या रुग्णांमध्ये असामान्य वाढ झालेली नाही, असेही केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. सर्व उपलब्ध स्रोतांच्या माध्यमातून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे, अशीही माहिती देण्यात आली. एचएमपीव्हीच्या चीनमधील उद्रेकाबाबत जागतिक आरोग्य संघटनाही वेळोवेळी माहिती देत आहे. नुकत्याच केलेल्या रंगीत तालमीमधून भारत संभाव्य परिस्थिती हाताळण्यास सज्ज असल्याचे दिसले, असेही मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.

## धास्तीने बाजार कोसळला

>> पान १ वरून

खाली आले, त्यामुळे गुंतवणूकदारांना मोठा फटका बसला. आज 'सेन्सेक्स' १.५९ टक्क्यांनी घसरून ७७,९६४ अंशांवर बंद झाला. दिवसभरात त्याने १४४१ अंशांची घसरण दाखवत, ७७,७८१ अंशांची पातळी गाठली होती, दिवसअखेर त्यात आणखी घसरण झाली. 'निफ्टी' १.६२ टक्क्यांनी घसरून २३,६१६ अंशांवर स्थिरावला. या घसरणीमुळे 'बीएसई'वरील नोंदणीकृत कंपन्यांचे बाजार भांडवलमूल्य १० लाख ९८ हजार ७२३ कोटी रुपयांनी घसरून ४.३८ लाख कोटी रुपयांवर आले. त्यामुळे गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले. 'सेन्सेक्स'वरील टाटा स्टील, एनटीपीसी, कोटक महिंद्रा बँक, पॉवर ग्रिड, झोमॅटो, अदानी पोर्ट्स, इंडसइंड बँक, एशियन पेंट्स, आयटीसी आणि रिलायन्स इंडस्ट्रीज यांनी सर्वांत जास्त घसरण नोंदवली, तर टायटन, एचसीएल टेक आणि सन फार्मा यांच्या शेअरचे भाव वाढले. आज सर्व क्षेत्रीय निर्देशांकांत घसरण झाली. युटिलिटीज ४.१६ टक्के, वीज ३.७३ टक्के, सेवा ३.४५ टक्के, धातू ३.१५ टक्के, तेल आणि वायू ३.१५ टक्के, ऊर्जा ३.०३ टक्के, औद्योगिक २.९७ टक्के आणि वस्तू २.७४ टक्के घसरले.

"'एचएमपीव्ही' विषाणूच्या संसर्गाचे रुग्ण देशात आढळून आल्याने गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झालेली भीती, बँकिंग शेअरमधील घसरण, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) केलेली विक्री आणि तिसऱ्या तिमाहीतील कंपन्याच्या निकालाबाबतची चिंता यामुळे भारतीय शेअर बाजारात विक्रीचा मारा झाल्याने बाजार कोसळला. नव्या विषाणूशी संबंधित चिंता कमी होईपर्यंत बाजार अस्थिर राहण्याचा अंदाज आहे.

**- सिद्धार्थ खेमका,** संशोधन प्रमुख, मोतीलाल ओसवाल सर्व्हिसेस

### ठळक घडामोडी

- 'बीएसई'वरील कंपन्यांचे बाजार भांडवल ११ लाख कोटी रुपयांनी खाली
- 'बीएसई'वर तब्बल ३४७४ शेअर घसरले, तर ६५६ वाढले व ११४ स्थिर
- 'निफ्टी' आणि 'बँक निफ्टी' दोन्ही त्यांच्या २०० दिवसांच्या सरासरीच्या खाली
- सर्व क्षेत्रीय निर्देशांकांत घसरण; स्मॉल कॅप ३.१७ टक्के व मिड कॅप २.४४ टक्क्यांनी खाली
- 'एफआयआय'कडून शुक्रवारी ४२२७ कोटी रुपयांच्या शेअरची विक्री

## एचएमपीव्हीसाठी यंत्रणा सज्ज

>> पान १ वरून

नसल्याचे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अलीकडेच देशभरात केलेल्या तयारीचा आढावा घेतला आहे. श्वसनसंबंधातील आजारांमध्ये होणाऱ्या कोणत्याही संभाव्य प्रसारावर मात करण्यासाठी भारत उत्तम प्रकारे सज्ज असून गरज पडेल तेव्हा सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात तत्काळ हस्तक्षेप केला जाईल. असे मंत्रालयाने म्हटले आहे. एचएमपीव्हीशीसंबंधित श्वसनाचे आजार भारतासह जगभरात आधीच निदर्शनास आले आहेत. आयसीएमआर आणि एकिकृत आजार देखरेख कार्यक्रमाने (आयडीएसपी) गोळा केलेल्या माहितीनुसार इन्फ्ल्युएंझासारखे आजार किंवा गंभीर श्वसनाच्या आजारांच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झालेली नाही. आयसीएमआर संपूर्ण वर्षभर एचएमपीव्हीच्या संभाव्य संसर्गावर नजर ठेवणार असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

## लक्षणांनुसार औषधोपचाराने संसर्गावर मात शक्य

>> पान १ वरून

अध्यक्षतेखाली मार्गदर्शक सूचना व उपचारांची दिशा ठरविण्याबाबत कृतिदलाची स्थापना करण्यात आली आहे. ससून रुग्णालयाच्या बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. आरती किणीकर म्हणाल्या, "एचएमपीव्ही हा श्वसनयंत्रणेशी संबंधित रोग आहे. एक वर्षाच्या आतील मुलांमध्ये त्याचे प्रमाण थोडे जास्त असते. तसेच मोठ्यांमध्ये ज्यांना सहव्याधी जसे मधुमेह, एचआयव्ही, लठ्ठपणा व वयोवृद्धत्व आहे, त्यांनाही याचा प्रादुर्भाव होऊ शकतो. याचा संसर्ग मात्र सौम्य ते गंभीर प्रकारचा होऊ शकतो."

## पुन्हा 'लाल' दहशत

>> पान १ वरून

प्लॅस्टिकच्या शीटमध्ये गुंडाळून ठेवण्यात आले होते. या स्फोटानंतर जवानांना घेऊन जाणाऱ्या गाडीचा तुकडा एका झाडावर २५ फूट उंचीवर अडकून पडला होता त्यावरून या स्फोटाची तीव्रता समजू शकते. या हल्ल्याबाबत बोलताना मुख्यमंत्री विष्णूदेव साय म्हणाले की नक्षलवाद्यांना नैराश्य आले असून या नैराश्यापोटीच त्यांच्याकडून अशा पद्धतीने हल्ले केले जात आहेत.

या जवानांचे बलिदान वाया जाऊ दिले जाणार नाही. या चकमकीमध्ये हुतात्मा झालेल्या जवानांच्या आत्म्याला शांती मिळावी अशी प्रार्थना मी करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खामध्येही मी सहभागी आहे.

## नवोपक्रमांचा वापर करावा: ओम बिर्ला

नवी दिल्ली, ता. ६ : ग्रामीण व आदिवासी भागातील महिला लोकप्रतिनिधींनी आपापल्या क्षेत्रातील विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, नवोपक्रमांचा वापर करावा, असे आवाहन लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज केले. दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय संमेलनात ते बोलत होते. देशभरातील २२ राज्यांमधून आलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमधील महिला लोकप्रतिनिधींचे राष्ट्रीय संमेलन आज दिल्लीत झाले.

## चंद्रकार खूनप्रकरणी मुख्य आरोपीस बेड्या

**बिजापूर, ता. ६ (पीटीआय)** : छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यातील पत्रकार मुकेश चंद्रकार यांच्या खूनप्रकरणातील मुख्य आरोपीस विशेष तपास पथकाने (एसआयटी) आज हैदराबाद येथून अटक केली. संबंधित आरोपी हा कंत्राटदार असून चंद्रकार यांच्या खुनाचे प्रकरण उघड झाल्यापासून तो फरार झाला होता.

राज्य सरकारकडून या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले होते. सुरेश चंद्रकार असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याला रविवारी रात्री हैदराबाद येथून अटक करण्यात आली होती असे पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी सांगितले. याच प्रकरणामध्ये सुरेश चंद्रकारचा भाऊ रितेश चंद्रकार, दिनेश चंद्रकार आणि सुपरव्हायझर महेंद्र रामटेके यांना याआधीच आधीच अटक करण्यात आली आहे. मुकेश चंद्रकार (वय ३३) हे मुक्त पत्रकार होते. ते १ जानेवारीपासून बेपत्ता होते,

## धनंजय मुंडेंना तूर्त अभय?

>> पान १ वरून

ते फडणवीस यांना सांगावे अशी समजवजा सूचना त्यांना केल्याचे कळते. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनीच याला दुजोरा दिल्याचे समजते. आज रात्री उपमुख्यमंत्री पवार यांनी फडणवीस यांची सागर बंगल्यावर भेट घेतल्याने चर्चेला उधाण आले आहे. परदेशातून परतलेल्या पवार यांनी सर्व परिस्थिती जाणून घेतली असून मुंडेंच्या राजीनाम्याची गरज नाही असे त्यांचे मत असल्याचे समजते. ज्येष्ठ नेते छगन भुजबळही मुंडे यांच्या मदतीला धावून आले असून आरोप सिद्ध झाला नसतानाही राजीनामा कशाला अशी भूमिका त्यांनी जाहीरपणे मांडली. आज रात्री उशिरा या अनुषंगाने सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याचे कळते. सरपंच देशमुख खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी सरकारने १० जणांचे विशेष पथक म्हणजेच 'एसआयटी'ची स्थापन केली आहे. त्यात समावेश असलेले साहाय्यक पोलिस निरीक्षक महेश विघ्ने यांची वाल्मीक कराडशी जवळीक असल्याचा आरोप करण्यात आला होता. कराडसोबतचा त्यांचा फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर त्यांची 'एसआयटी' पथकातून उचलबांगडी करण्यात आली आहे. विघ्ने यांच्यासोबत हवालदार मनोज वाघ यांनाही बाजूला सारण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड म्हणाले' "देशमुख यांच्या खून प्रकरणात शासनाने एसआयटी नेमली असून यात आरोपी वाल्मीक कराडच्या जवळचे पोलिस अधिकारी असल्याचे आपण जाहीर केले होते. यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना शासनाने बाजूला केले. मित्र आहे म्हणून अधिकाऱ्यांना बाहेर काढले जाते असेल तर त्यांच्या जवळचे मित्र असलेल्या धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून बाहेर का काढले जात नाही?

Sakal Readers Connect Initiative

## गर्भधारणेसाठी संघर्ष करणाऱ्यांना 'गुड न्यूज'

**पुणे, ता. ६ :** वंध्यत्वाशी संबंधित अनेक अशक्य वाटणाऱ्या गोष्टी प्रोजेनेसिस फर्टिलिटी सेंटरमध्ये यशस्वीपणे हाताळल्या जातात. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने 'इन विट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) या परिणामकारक उपचार पद्धतीचाही येथे अवलंब केला जातो. त्यातून यशस्वी गर्भधारणा होते.

वंध्यत्वाची समस्या सध्या वेगाने वाढत आहे. महिलांमध्ये पीसीओडी, लो एएमएच, बंद गर्भनलिका, एंडोमेट्रियोसिस आणि इतर गर्भाशयाच्या समस्या ही वंध्यत्वामागील मुख्य कारणे आहेत.

'आयव्हीएफ'मध्ये फर्टिलायझेशन केले जाते. प्रोजेनेसिस फर्टिलिटी सेंटरमध्ये ही प्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली केली जाते, ज्यामुळे यशस्वी गर्भधारणेची शक्यता वाढते. हे सेंटर वंध्यत्व उपचारांसाठी विश्वासार्ह केंद्र आहे. येथे अत्याधुनिक उपचार पद्धतीचा वापर करून प्लाझ्मा थेरपी, फर्टिलिटी प्रिझर्वेशन तसेच व्यक्तिगत सल्लामसलतीसह योग्य उपचार केले जात असल्याचे सेंटरतर्फे सांगण्यात आले.

Godrej Finance Limited
गोदरेज फायनान्स लिमिटेड
Godrej | FINANCE
गोदरेज | फायनान्स

सार्वजनिक सूचना

**'गोदरेज फायनान्स लिमिटेड' द्वारे मास्टर डायरेक्शन - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - स्केल बेस्ड रेग्युलेशन) निर्देश, २०२३ च्या परिच्छेद ४३ नुसार सार्वजनिक सूचना**

**गोदरेज फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "जीएफएल") ही कंपनी कायदा, १९५६ (कॉर्पोरेट आयडेंटिफिकेशन नंबर: यू६७१२०एमएच१९९२पीएलसी०६५४५७) अंतर्गत समाविष्ट केलेली एक पब्लिक लिमिटेड कंपनी आहे आणि भारतीय रिझर्व्ह बँक (सीओआर. क्रमांक:१३.००३६८) नॉन डिपॉझिट नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी ("एनबीएफसी") म्हणून नोंदणीकृत आहे. जीएफएलचे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज वन, पिरोजशानगर, इस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पू), मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे नोटीस दिली जाते की, कंपनीने आपले शाखा कार्यालय ५७६, माणिक मोती, बुधवार पेठ, वसंत टॉकीज समोर, पुणे - ४११००२, महाराष्ट्र इथून कार्यरत कारणांमुळे कार्यालय क्र. ४०२, ४था मजला, एस.के फॉर्च्युन, चिंतामणी, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, महाराष्ट्र, येथे ही नोटीस जारी केल्याच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत स्थलांतरित करण्यात येणार आहे.

ग्राहकांच्या सर्व शंका customercare@godrejcapital.com वर संबोधित केल्या जातील.

या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात या नोटिसच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत श्री योगेश जैन, मुख्य अनुपालन अधिकारी यांना किंवा gfl.compliance@godrejfinance.com वर संबोधित केल्या जातील.

एसडी/-
**गोदरेज फायनान्स लिमिटेडच्या वतीने**

स्थळ: पुणे
दिनांक: 07/01/2025